**अतित्वर्य /कालमर्यादा**

सामान्य प्रशासन विभाग,
आस्थापना विभाग,पुणे मनपा.
जावक.क्र.:- मा.प्र./आस्था/प्र-७/ ९७१८
दिनांक :- 02/12/2024

**-: कार्यालय परिपत्रक :-**

विषय :- निलंबन आढावा समितीची बैठक आयोजित करणेसाठी पुणे महानगरपालिकेतील विविध खात्यातून निलंबित असणाऱ्या सेवकांची माहिती विहित नमुन्यात पाठविणेबाबत.

संदर्भ :- कार्यालय परिपत्रक जा.क्र.मआ/उआ/से/४३६४, दि.१०/०१/२०१२.

पुणे महानगरपालिकेच्या सेवेतून निलंबित झालेल्या सेवक/अधिकारी यांचे निलंबनाचा आढावा घेणे कामी समिती स्थापन करण्यात आली असून समितीचे कामकाजाबाबत मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आली आहेत. त्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेतील निलंबित असणाऱ्या सेवक/अधिकाऱ्यांचा निलंबनाचा आढावा घेणेसाठी निलंबन आढावा समितीची बैठक आयोजित करावयाची आहे. त्या अनुषंगाने खालील माहिती आवश्यक आहे.

१) न्यायालयात दाखल झालेल्या दोषारोपपत्रातील दोषारोपांचे गांभीर्य,स्वरूप व व्याप्ती तसेच, तो सिध्द झाल्यास होऊ शकणारी कमाल शिक्षा.

२) निलंबनाचा कालावधी.

३) विभागीय चौकशीतील सध्यस्थिती, दोषारोपपत्र व विभागीय चौकशी अहवाल.

४) फौजदारी गुन्हयातील सेवकांबाबत

अ) संबंधित सेवकाकडून फौजदारी गुन्हा घडल्याचे कारण व त्याबाबत विस्तृत माहिती.

ब) संबंधित सेवकाकडून घडलेला फौजदारी गुन्हा पुणे महानगरपालिकेशी संबंधित आहे अगर कसे?

क) संबंधित सेवक कारागृहात आहे किंवा त्यास जामिन झाला आहे किंवा नाही,झाला असल्यास जामिनाचा दिनांक व कागदपत्रासंबंधी माहिती संबंधीत पोलीस स्टेशनकडून प्राप्त करुन घ्यावी व इकडील विभागास सादर करावी.

ड) फौजदारी गुन्ह्याच्या अनुषंगाने खातेनिहाय चौकशी केली अगर कसे? तसेच खातेनिहाय चौकशीची सध्यस्थिती काय आहे?

इ) संबंधित सेवकांबाबत फौजदारी गुन्ह्यातील मे. कोर्टामध्ये आरोपपत्र दाखल झाले अगर कसे? झाले असल्यास केस नं. व केसची सध्यस्थिती संबंधीत पोलीस स्टेशनकडून प्राप्त करुन घ्यावी व इकडील विभागास सादर करावीत.

५) संबंधिताविरूध्द चालू असलेली विभागीय चौकशी/न्यायालयीन कार्यवाही/दोषारोप पत्र सादर करण्याच्या कार्यवाहीच्या विलंबास संबंधित अपचारी जबाबदार आहे किंवा कसे?

६) संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या खातेनिहाय चौकशी प्रकरणातील दोषारोप पत्राची व खातेनिहाय चौकशी अहवालाची प्रत.

७) संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांचा त्यापुर्वीचा सेवा तपशिल व संबंधित मा. खातेप्रमुख यांचे मत.

८) संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांस अदा करण्यात येणाऱ्या निर्वाह भत्याची टक्केवारी व रक्कम.

९) सर्व विभाग/कार्यालयां मधील निलंबित असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचे आज्ञापत्राची प्रत व कोणत्या कारणासाठी निलंबित केले आहे याची माहिती.

निलंबन आढावा समिती समोर सादर करण्यात येणाऱ्या प्रकरणांबाबत निर्णय घेवून उचित शिफारस करणेसाठी संबंधित अपचारी सेवक/अधिकारी यांचेबाबत वरील मुद्दयाबाबतची माहिती आवश्यक आहे.

तरी ज्या प्रकरणी म.न.पा. अधिकारी/कर्मचाऱ्यांवर बेहिशेबी मालमत्ता,नैतिक अध:पतन,लाचलुचपत खून,खूनाचा प्रयत्न करणे,बलात्कार या व यासारख्या गंभीर प्रकरणात फौजदारी गुन्हा दाखल झाल्यामुळे निलंबनाची कारवाई करण्यात आली असेल अशा प्रकरणी निलंबन आढावा समितीसमोर सादर करण्याची तरतूद संदर्भांकित कार्यालय परिपत्रकामध्ये आहे. त्या अनुषंगाने संबंधित खातेप्रमुख यांनी वर नमूद केलेल्या मुद्दा क्र.१ बाबत विधी विभागाचा अभिप्राय घेण्यात यावा आणि मुद्दा क्र.२ ते ८ बाबतची माहिती नमूद करून संबंधित निलंबित सेवक/अधिकारी यांचे बाबतचे प्रस्ताव दि. १२/१२/२०२४ अखेर आस्थापना विभागाकडे सादर करावेत.

तरी सदर कार्यालय परिपत्रकाची नोंद घेवून जरूर ती पुढील कार्यवाही विहित मुदतीच्या आत करावी ही विनंती.

(प्रतिभा पाटील)
उप आयुक्त (सा.प्र.)
पुणे महानगरपालिका

प्रत:-
१) मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि)
२) मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
३) मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (इ)
पुणे महानगरपालिका

यांजकडेस माहितीस्तव सादर....

४) सर्व मा. खातेप्रमुख/उप आयुक्त (परिमंडळ क्र. १ ते ५)/महा.सहा.आयुक्त(क्षेत्रिय कार्यालय)
पुणे महानगरपालिका.

यांजकडेस जरूर त्या पुढील कार्यवाहीसाठी...